VAJI COLLEGE
S. HINGOLI




SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 050000

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

76



# कोविड-19 आणि भारतीय अर्थव्यवस्था

दक
अशोक पी. टिपरसे
ाटील निळकंठराव

# पुनरावलोकन समिती
## (Review Committee)

**डॉ. संतोष कदम**
संतोष पाटील महाविद्यालय, मंद्रूप,
अध्यक्ष व्यवसायीक अर्थशास्त्र अभ्यास मंडळ,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**डॉ. अविनाश शेंद्रे**
प्रगती कला आणि वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली,
सदस्य अर्थशास्त्र अभ्यास मंडळ,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. शाजी सहदेवान**
राष्ट्र माता इंद्रा गांधी कला, विज्ञान आणि वाणिज्य
महाविद्यालय, जालना.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**Assistant Professor**
**Shivaji College, Hingoli.**
**Tq.& Dist.Hingoli.(MS.)**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधीत पेपर व लेखाचे नांव | लेखकाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1. | कोवीड -19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे संभाव्य परिणाम | डॉ. आर. एस. वानखेडे | 9 |
| 2. | कोविड-१९ चा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम | प्रा. डॉ.सर्जेराव गंगाधर गोल्डे | 14 |
| 3. | कोव्हिड-19 चे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम | डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव | 20 |
| 4. | कोविड-१९ चे भारतीय अर्थव्यवस्थेतील निवडक क्षेत्रावर झालेले परिणाम | प्रा. देविदास गोकुळ गवळी | 28 |
| 5. | कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम - एक दृष्टिकोण | प्रा. डॉ. शालिनी उत्तमराव कदम | 36 |
| 6. | कोविड-१९ चा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम : एक अभ्यास | प्रा. डॉ. रामदास मुक्टे | 43 |
| 7. | कोविड-१९ नंतरची देशातील आर्थिक परिस्थिती - एक दृष्टिक्षेप | डॉ. प्रदीप साहेबराव जाधव | 49 |
| 8. | कोरोणा-भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ.डी.डी.चौधरी | 54 |
| 9. | कोविड-19चे महाराष्ट्रातील बांधकाम कामगारावर झालेला परिणाम | डॉ. शिवाजी पाते गंगाधर लक्ष्मणराव गायकवाड | 67 |
| 10. | कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम | प्रा. पवार अविनाश विलासराव | 73 |
| 11. | कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था | प्रा.डॉ. एस.बी पाते कु. पल्लवी दाजी वाघ | 80 |
| 12. | कोविड १९ पश्चात भारतीय अर्थव्यवव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या संधी | डॉव्यंकटेश मदनुरे . काळुराम | 85 |


77

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •


**संदर्भग्रंथ सुची:**

1. Lekha Chakroborty, Emmauel Thomas (2020), "COVID-19 and Macroeconomic University: Fiscal and Monetary Policy Response", Economic & Political Weekly, Vol. 55, Issue No. 15, 11th April, 2020.
2. Dev. S. Mahendra (2020), "Addressing COVID-19 impacts on Agriculture, Food Security and Livelihoods in India, IFPRI Blog, April 8, 2020.
3. S. Mahendra Dev and Rajeswari Sengupta (2020), "COVID-19: Impact on the Indian Economy Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai, April-2020.
4. Sajeeb Mukherjee (2020), "Agriculture Clocks Growth Rate of 3.4% in $Q_1$ Despite GDP Construction", Business Standard, September 01, 2020.
5. Report of Centre for Monitoring Indian Economy (CMIE), 7th April, 2020, 7th April. 2020, January, 2021.
6. Dr. Kishore Kumar Das & S. Patnaik (2020), "The Impact of COVID-19 in Indian Economy - An Empirical Study", International Journal of Electrical Engineering and Technology, 11(3), 2020, PP. 194-202 (29th June, 2020 online)
7. Anya Kamra (2020), "Impact of COVID-19 on the Indian Economy", International Journal of Advanced Research (IJAR), 18th August, 2020 (ISSN 2320-5407).
8. Dr. Nikita Arora, Vaishnavi Gupta (2020), "Study on Impact of COVID-19 on Indian Economy", IJSR, Vol. 9, Issue 7, July 2020.



**प्रा. डॉ. शालिनी उत्तमराव कदम**
सहाय्यक प्राध्यापक, सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.




# कोविड-१९ चा शिक्षण क्षेत्रावर झालेला परिणाम : एक अभ्यास

- **प्रा. डॉ. रामदास मुक्टे**

**प्रस्तावना :**

कोविड-१९ या संसर्गजन्य महामारीचा प्रभाव संपूर्ण जगामध्ये जवळपास १९७ देशात कमी अधिक प्रमाणाते झाल्याचा दिसून येतो. 'कोविड -१९ या आजाराची सुरुवात चिन या देशामध्ये झाली. चिनमधील वूहान या शहरातील ५७ वर्षीय महिला जी की झिंगे विकत होती. तीला प्रथम कोविड आजाराची लागण झाली. या महिलेचे नाव वेई गुईजियान असे होते. ही महिला म्हणजेच जगातील कोविड चा पहिला रुग्न आहे.'[१] त्यानंतर संपूर्ण जगात या संसर्गजन्य रोगाचा प्रसार झाला. अनेक देशात या रोगाने गंभीर स्वरुप धारण केले होते. अनेक लोकांचा मृत्यू या रोगामुळे झाला. यामुळे जागतिक पातळीवर कोविड-१९ जागतिक महामारी असे नाव देण्यात आले.

भारतामध्ये ही कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रसार चिन कडूनच झाला आहे. 'चिनमधील वूहान या शहरातील आरोग्य विद्यापीठामध्ये शिक्षण घेणाऱ्या केरळ राज्यातील २० वर्षीय विद्यार्थीनीला कोरोनाची लागण झाल्याचे निष्पण्ण झाले होते. ही विद्यार्थीनी २५ जानेवारी २०२० ला भारतात आली होती.'[२] ही विद्यार्थीनी म्हणजेच भारतातील पहिली कोविड-१९ चा रुग्ण आहे. त्यानंतर भारतामध्ये मोठ्या प्रमाणात कोविड चा प्रसार झाला. या रोगाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी भारतातील सर्व केंद्रप्रशासीत प्रदेश आणि राज्यांमध्ये महामारी रोग अधिनियम १८९७ लागू करुन संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहिर करण्यात आला. जगातील अनेक देशांनी ही लॉकडाऊन जाहीर केला. परंतू केवळ चिन वगळता संपूर्ण जगामध्ये कोरोणा या रोगाने हाहाकार निर्माण झाला होता. 'सध्याच्या आकडेवारी नुसार जगात कोरोना बाधितांची संख्या ९,६०,०९८९१ झाली आहे. त्यामध्ये २०४९३४८ लोकांचा मृत्यू झाला आहे. तर ६८६३०१३४ रुग्न बरे झाले आहेत. भारत, अमेरिका आणि ब्राझील मध्ये वायरसचा प्रभाव अधिक आहे. भारतामध्ये कोरोना वायरस संक्रमित झालेल्या लोकांची संख्या १०५८१८३७ झाली असून १०२२८७५३ रुग्न कोरोनामुक्त झाले आहेत. तर मृत्यू झालेल्या लोकां



Shivaji C...
Tq. & Dist. H...

78

संख्या १५२५५६ झाली आहे.[13] यावरुन लक्षात येते की कोरोना व्हायरसचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जगाबरोबरच भारतावरही होता.

**संशोधनाची आवश्यकता :**

कोविड चा प्रभाव कमी करण्यासाठी अनेक उपाय योजना करण्यात आल्या. त्यापैकी विशेषतः लॉकडाऊनमुळे कोविड-१९ चा परिणाम देशातील सर्वच क्षेत्रात कमी-अधिक प्रमाणात झाला आहे. देशात बेरोजगारी, दारिद्र्य, विकास दरातील घट, वाहतूकीची समस्या अशा अनेक समस्यांच्या निर्मिती बरोबर शिक्षणाची समस्या निर्माण झाली आहे. लॉकडाऊन आणि सोशल डिस्टेन्सींग यामुळे प्रत्यक्ष शिक्षण देण्याची व घेण्याची पध्दती काही काळासाठी बंद झाली आहे. शिक्षण पध्दती कायम स्वरुपी बंद ठेवणे अशक्य असल्यामुळे त्यातुन मार्ग काढण्यासाठी सुरक्षित राहुन शिक्षण घेण्याची व देण्याची पध्दती स्विकारण्यात आली. ती म्हणजेच ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा स्विकार करण्यात आला. शिक्षण क्षेत्रामध्ये झालेला हा आमुलाग्र बदल व त्याचे लाभ आणि दोष काय आहेत. हे लक्षात घेऊन त्यांचे विश्लेषण करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तूत लघू संशोधन करण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या प्राथमिक व द्वितीय संशोधन पध्दतींपैकी द्वितीय संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रस्तुत संशोधन कार्यासाठी लागणारी सामुग्रीचे संग्रहन वृत्तपत्र, मासिके, साप्ताहिके, संदर्भ ग्रंथ त्याचबरोबर ऑनलाईन वेब, युटूब यांच्या माध्यमाने करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) कोविड-१९ चा शैक्षणिक क्षेत्रावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

२) कोविड-१९ चा प्रभाव म्हणून शिक्षण क्षेत्रात आधुनिक ई-तंत्रज्ञानाच्या माध्यमाने निर्माण झालेली ऑनलाईन एज्युकेशन पध्दतीचे विश्लेषण करणे.

३) भारतातील ऑनलाईन एज्युकेशनच्या लाभाचा आढावा घेऊन त्यामध्ये असलेल्या समस्यांचे विश्लेषण करणे.



**संशोधनाची गृहिते :**

१) शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत ऑनलाईन एज्यूकेशन सुरु झाले आहे.

२) ऑनलाईन एज्यूकेशनचा भारतात विद्यार्थ्यांना लाभ होत आहे.

३) ऑनलाईन एज्यूकेशन पध्दती संदर्भात भारतात मोठ्या समस्या आहेत.

**कोविड-१९ आणि शैक्षणिक क्षेत्र :**

कोविड-१९ चा देशातील प्रभाव कमी करण्यासाठी जगातील प्रत्येक देशांनी विविध प्रकारचे प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये भारत अपवाद नाही. कोविड-१९ या महामारीचा विपरीत परिणाम थांबविण्यासाठी जगात एक प्रमुख उपाय हाती घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. तो उपाय म्हणजे देशात लॉकडाऊन जाहिर करण हाच होय की, ज्यामुळे समाजातील लोक एकत्र येणार नाहीत. प्रत्येक जण आप-आपल्या घरी सुरक्षित राहिल. कोरोना या संसर्गजन्य रोगापासुन त्यांचा बचाव होईल. भारतामध्येही मार्च २०२० पासुन मे २०२० पर्यंत कडक लॉकडाऊन करण्यात आला होता. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्र बंद अवस्थेत गेले. अनेक लोकांचा रोजगार गेला, कामासाठी स्थलांतरीत झालेली लोक परत आपल्या गावाकडे परत यायला सुरुवात झाली. वाहतूकीची व्यवस्था ठप्प झाल्यामुळे पायीं प्रवास करतांना अनेक कामगार दिसून आले. रोजगार गेल्यामुळे अनेकांना उपासमारीची वेळ आली. देशाच्या विकास दरात मोठ्या प्रमाणात घट झाली. हजारो कोटी रुपयांचे नुकसान सरकार पासुन ते सामान्य व्यक्तीला सहन करावे लागले.

कोविड-१९ मुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झ ाले आहेत. या बदला बरोबरच शैक्षणिक क्षेत्रातही बदल झाल्याचे दिसून येतात. कोरोनाच्या काळात एकमेकांपासून दूर राहणे प्रत्येकांनी पसंत केले किंवा ते आवश्यक होते. कारण संसर्गजन्य रोगापासून वाचण्याचा तो एकच उपाय होता. त्यामुळे लॉकडाऊन काळापासुन ते आजपर्यंत शाळा महाविद्यालय पूर्णतः सुरु झ ाले नाहीत. विद्यार्थ्यांसाठी वर्ग बंद आहेत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि विद्यार्थी सुरक्षित ही असावे या दोन उद्देशातून शैक्षणिक क्षेत्रात पुर्व प्राथमिक क्षेत्रापासून ते उच्च शिक्षणापर्यंत एक अमुलाग्र बदल झाला



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
Ghodekar
Assistant Professor
Shivaji College Hingoli.

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

आहे. ते म्हणजे ई-शिक्षण (E-education) यालाच आपण ऑनलाईन एज्यूकेशन असे म्हणतो.

'प्रत्यक्ष वर्गात उपस्थित न राहता सुरक्षित ठिकाणी राहून ई-माध्यमाने शिक्षण देण्याची -घेण्याची पध्दती म्हणजे ऑनलाईन एज्यूकेशन होय.'

कोविड-१९ पासून सुरक्षित राहण्याच्या उद्देशाने शाळा-महाविद्यालये बंद होऊन शाळा-महाविद्यालय कॅम्पस संकल्पना संपुष्टात येऊन रिमोट कंट्रोल संकल्पना अस्तित्वात आली. ई-माध्यमाच्या मदतीला आपल्या हातात रीमोट कंट्रोल ठेवून शिक्षण देयाची व घेण्याची पध्दती स्विकारण्यात आली. या ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे शिक्षण क्षेत्रामध्ये काय लाभ किंवा समस्या-दोष आहेत याचे विश्लेषण खालील प्रमाणे करता येते.

**ऑनलाईन एज्यूकेशन्सचे फायदे :**

१) घरी बसुन सुरक्षित ठिकाणी शिक्षण घेता येत.
२) सामुहिक वेळापत्रकाची आवश्यकता नाही. कारण विद्यार्थी आपल्या वेळाप्रमाणे व्हिडीओद्वारे शिक्षण घेऊ शकतात.
३) एखादा पाठ पुन्हा-पुन्हा शिकवण्याची आवश्यकता नाही. कारण विद्यार्थी अनुपस्थित असेल तरी आपण त्याला त्या शिकवणी वर्गाचा व्हिडीओ पाठवू शकतो.
४) एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांना व्याख्यान देणे शक्य होते.
५) पायाभूत साधने उदा. इमारत, बेंच व इतर साधनांची आवश्यकता नसते.
६) नविन तंत्रज्ञान शिकण्याची संधी शिक्षक व विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.
७) व्याख्यान स्वयंचलित करता येतात, त्यामुळे प्रत्यक्ष व्याख्यात्यांना उपस्थित राहण्याची आवश्यकता नसते.
८) वेळेची बचत होते. व्याख्यान देण्यासाठी एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा वेळ वाचतो. तसेच व्याख्यानाचा व्हिडीओ दिला तर आपण इतर काम करु शकतो.
९) ऑनलाईन एज्यूकेशनमुळे व्याख्यात्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थरावर ओळख होते.
१०) प्रॅक्टीकल एज्यूकेशन ऐवजी थेअरी एज्यूकेशनवर अधिक भर दिला जातो.



११) प्रत्यक्ष वर्गात शिकवण्यासाठी जो खर्च येतो. त्या ऐवजी ऑनलाईन एज्युकेशन द्वारा एज्यूकेशन दिले तर येणारा खर्च कमी येतो.
१२) सुचना किंवा इतर नविन बदल सर्व विद्यार्थ्यांना ताबडतोब देता येतात.

इत्यादी प्रकारचे लाभ ऑनलाईन एज्यूकेशन पध्दतीचे दिसून येतात.

**ऑनलाईन एज्यूकेशन पध्दतीमधील समस्या :**

ऑनलाईन पध्दतीमुळे विद्यार्थी-शिक्षण यांना होणाऱ्या लाभाबरोबरच यावेळी त्यांना काही समस्या दिसून येतात. त्या पुढीलप्रमाणे.

१) सर्वच विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन एज्यूकेशन घेण्यासाठी ई-साधनाची उपलब्धता आहे. असे नाही ज्यांच्याकडे साधने उपलब्ध नाहीत. ते शिक्षणापासून ते वंचीत राहतात.
२) ई-साधने उपलब्ध असले तरीही त्यासाठी आवश्यक असणारी नेटवर्क संपर्क अनेक वेळा उपलब्ध होत नाही.
३) ऑनलाईन पध्दतीने शिक्षण देतांना विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवणे कठिण असते.
४) नविन तंत्रज्ञान व्याख्यात्यांना अगोदर शिकावे लागते. व्याख्याते ई-तंत्रज्ञान पारंगत असतील तरच ऑनलाईन एज्यूकेशन संकल्पना यशस्वी होईल अन्यथा नाही.
५) विद्यार्थ्यांना सुध्दा नविन तंत्रानाचे ज्ञान आवश्यक आहे.
६) ऑनलाईन एज्यूकेशनसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना नेटवर्क व ई-साधने उपलब्धीसाठी पैसे खर्च करावे लागतील.
७) विज्ञान व इतर प्रात्यक्षिक असणाऱ्या विषयांसाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त होणार नाही.
८) विद्यार्थी स्वत: होऊन ऑनलाईन शिक्षण घेतील काय ? हा प्रश्न निर्माण होतो.
९) विद्यार्थ्यांचे मुल्यमापन कसे करावे ? हा प्रश्न निर्माण होतो. योग्य मुल्यमापन होत नाही.

इत्यादी प्रकारच्या प्रमुख समस्या ऑनलाईन शिक्षण पध्दतीमध्ये दिसून येतात.

**निष्कर्ष :**

१) ऑनलाईन पध्दतीने सुरक्षित शिक्षण उपलब्ध होऊन कोविड-१९ च्या काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येते.
२) एकच शिक्षक अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण देऊ शकतो. त्यामुळे अनेक शिक्षकांची गरज भासणार नाही व खर्च कमी होईल.

Ghodekar
Assistant Profess
Shivaji College, Hingo
Tq.& Dist.Hingoli.(MS

३) भारतासारख्या ग्रामीण क्षेत्राचे मोठे अस्तित्व असणाऱ्या देशात ऑनलाईन एज्यूकेशन पध्दती यशस्वी होईल यात शंका आहे. कारण अनेक विद्यार्थ्यांकडे ई-साधने उपलब्ध नाहीत किंवा उपलब्ध असतील तरीही नेटवर्क उपलब्धतेचा प्रश्न अनेक वेळा निर्माण होत असल्याचा दिसून येतो.

४) ऑनलाईन पध्दतीने भारतामध्ये कमी-अधिक प्रमाणात ऑनलाईन एज्यूकेशन पूर्ण प्राथमिक पासून ते पदव्युत्तर वर्गापर्यंत सुरु आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात ही क्रांती आहे.

**सारांश :**

थोडक्यात कोविड-१९ मुळे शैक्षणिक क्षेत्रात निर्माण झालेल्या समस्येवर उपाय म्हणून ऑनलाईन एज्यूकेशन ही पध्दती पुढे आली. तेव्हा शैक्षणिक क्षेत्रातील ही एक आधुनिक क्रांती आहे. विद्यार्थी व शिक्षकांसाठी आधुनिक तंत्रज्ञान स्विकारण्यासाठी व त्यांचा वापर आपल्या विकासासाठी करण्याची एक संधी प्राप्त झाली आहे. तेव्हा नव्याने उपलब्ध झालेल्या या संधीकडे अनुकुल दृष्टीकोणातून बंघणे व त्यांचा स्विकार करणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांचे नुकसान कमी करुन सुरक्षित शिक्षण देण्याचा हा एक उपयुक्त मार्ग आहे.

**संदर्भ :**


१) www. aajtak.in-delivered.
२) www.bbc.com
३) www.economictimes.com
४) www.newindia.com
५) www.financialexpress.com
६) www.amarujala.com
७) www.hindikiduniya.com>essay.
८) डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोनी-'सामाजिक संशोधन पध्दती' - श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर नाकेवारी-२०००



- **प्रा. डॉ. रामदास मुक्टे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)




# कोविड-१९ नंतरची देशातील आर्थिक परिस्थिती - एक दृष्टिक्षेप

- **डॉ. प्रदीप साहेबराव जाधव**

**प्रास्ताविक :**

२०२० हे वर्ष सुदैवाने संपलेले आहे. सुदैवाने म्हणण्याचे कारण या वर्षात कारोना महासाथीने मानवी समाजाला मोठा हादरा दिलेला आहे. जवळपास जगातील प्रत्येक देशाला या विषाणूचा फटका बसला आहे. तर काही देशांची तर खुप हानी झाली आहे. अजुनही कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव आहे पण त्याची तिव्रता कमी झाली आहे. भारताबाबत सांगायचे झाले तर अर्थव्यवस्था बऱ्याच अंशी ढासळली आहे. लाखो लोकांनी रोजगार गमावले आहेत. अनेक उद्योगधंदे बंद पडले आहेत.

२०१८-१९ आणि २०१९-२० या काळात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आणि कोरानाने स्थिती आणखीच भीषण केली. टाळेबंदीमुळे देशाची परिस्थिती हातबलतेची झाली. ही सगळी परिस्थिती टोकाच्या अवस्थेत असताना किमान १३ कोटी लोकांनी स्वतःच्या रोजगार गमावला. आता नोकऱ्या हळूहळू परत मिळू लागल्या आहेत. पण अगोदर जे काम ही लोके करत होती ते काम त्यांना परत मिळत नाही ही सत्यता आहे. अगदी अलिकडची आकडेवारी पाहिली तर 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' - CEMIE च्या २२ डिसेंबर २०२० च्या आकडेवारीनुसार भारतात सध्या ८.७% बेरोजगारीचा दर आहे. दरम्यानच्या काळात अनेक लोक असे आहेत की जे कामावर परतले नाहीत. घरेलू कामे करणाऱ्या मंडळीनांही याचा फार मोठा फटका बसला आहे. पण त्यांची कुणी मनुष्यबाबत गिनती करत नाही. ही फार मोठी शोकांतिका आहे. थोडक्यात, रोजगार संपत्ती व कल्याण या तीनही गोष्टींना २०२० मध्ये फार मोठ्या प्रमाणावर धक्का बसला आहे.

**कोव्हिड-१९ भारतीय अर्थव्यवस्थेवरील स्वरूप आणि व्याप्ती :**

पहिल्या टाळेबंदीचा निर्णय अपरिहार्य होता. कारण मार्च महिन्यात कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी सामाजिक अंतर ठेवणे हा आपल्यासमोर